**नि.फौ.ख.क्र. १८७/२०२४**

**सरकार –वि– संदिप केदारे**

**निशाणी क्र. १६**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – रंजना बापू करचे

वय – ५३

धंदा – मजूरी

राहणार – खडकओझर, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. मी ३० मार्च रोजी फिर्याद दिली होती. आरोपी माझ्याकडे घटनेपूर्वी दोन दिवस माझे सोन्याचे कानातले डाग व गळ्यातील सोन्याचे पेंडल मागण्यासाठी आला होता. त्याच्या ट्रॅक्टरचा हप्ता भरायचा होता त्यासाठी हे दागिने आरोपीने माझ्याकडे मागितले होते. पण मी ते दागिने आरोपीला दिले नाहीत.

२. मी आरोपीला म्हणाले की, माझी मुलगी कामाला गेली आहे. तिला विचारल्याशिवाय मी तुला दागिने देणार नाही. तेव्हा आरोपी मला म्हणाला की, मला काय करायचे ते मी करेनच. मी खडकओझर येथे दळण दळण्यासाठी गेले होते. त्यावेळी माझ्या घराचा दरवाजा उघडा होता. मी घरी आल्यावर बघितले की, माझ्या घरातील पत्र्याची कोठी उघडी होती. त्यामध्ये मी माझे कानातील सोन्याचे डाग व गळ्यातील सोन्याचे पेंडल ठेवले होते. मात्र ते त्या पत्र्याच्या कोठीमध्ये नव्हते. ते दोन्ही मिळून दिड तोळ्याचे होते. आरोपी एकटाच माझ्या घरी येत होता व त्यानेच त्या दागिन्यांची माझ्याकडे मागणी केली होती. त्यामुळे मला खात्री पटली की, ते दागिने आरोपीनेच माझ्या घरातून चोरुन नेले आहेत. त्यामुळे मी आरोपीविरुद्ध पो.स्टेशनल फिर्याद दिली होती.

३. मला आता मी दिलेली फिर्याद दाखवण्यात आली. ती फिर्याद मला

माझ्या मुलीने वाचून दाखवली होती. त्यानंतर मी त्यावर अंगठा केला. त्याला **निशाणी १७** देण्यात येते. मी आरोपीला ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. व्ही. एस. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

४. मी दळणासाठी किती तारखेला गेले होते ते मला सांगता येणार नाही. फिर्याद देण्यासाठी आम्ही पो.स्टेशनल कोणत्या तारखेला गेलो ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज न्यायालयात काय साक्ष द्यायची हे मला माझ्या मुलीने सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीने मला सांगितल्यानुसार मी आज न्यायालयात साक्ष देत आहे.

५. आरोपी माझा भाचा आहे. आरोपी माझ्याकडे दागिने मागण्यासाठी किती तारखेला आला होता ते मला सांगता येणार नाही. तो दागिने मागण्यासाठी सकाळी ८ ते ९ च्या दरम्यान आला होता. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा आपण कोणत्याही कामासाठी घराबाहेर जातो तेव्हा सहसा घराचा दरवाजा बंद करुन जातो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या दरवाजाचा कडी–कोयंडा तुटलेला नव्हता. त्या पत्र्याच्या कोठीमध्ये शेंगा ठेवलेल्या होत्या असे माझ्या जबाबामध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी फिर्याद टंकलिखित केली व त्यावर मी अंगठा केला. साक्षीदार स्वतःहून सांगते की, तिने जे सांगितले त्यानुसार पोलिसांनी ते बरोबर केले.

६. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद अज्ञात व्यक्तीविरुद्ध दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, चोरीला गेलेले दागिने माझ्या स्वतःच्या मालकीचे होते हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पूर्वीपासून माझे व आरोपीचे संबंध चांगले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझा शेतीच्या बांधावरुन वाद देखील चालू होता.

७. हे म्हणणे खरे आहे की, चोरीला गेलेले दागिने किती वजनाचे व किती किंमतीचे होते ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडे स्वतःचा ट्रॅक्टर नाही. मी दळण घेऊन घरी किती वाजता परत

आले ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझे दागिने चोरल्याचा माझा केवळ संशय आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीचे संबंध चांगले नसल्यामुळे आम्ही एकमेकांच्या घरी जात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही एकमेकांशी बोलत देखील नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझे चांगले संबंध नसल्यामुळे रागाच्या भरात मी त्याच्याविरुद्ध ही फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा व चुकीचा आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.10 17:52:14 +0530

**दि. १०.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**